MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refreed Research Journal

# Vidyawarta

Issue-38, Vol-04, April to June 2021

2020-21

Editor
Dr.Bapu G. Gholap



Professor
Hingoli,
Hingoli (MS.)

65

SHIVAJI COLLEGE HINGOLI




13) To study the effect of synoptic learning to improve the academic ...
**Dr.Swapnil Bhalchandra Nirmal, Nashik** ||72

14) Role of Librarians in Social Science Research in Modern Era
**Jagannath V. Patait, Dist – Beed** ||74

15) Role of language lab and traditional method in developing oral ...
**Dr. Shivani Sharma, Bareilly** ||76

16) THE ROLE OF FOREIGN INVESTMENT : A CRITICAL VIEW
**Dr. Vidwesh Kumar, Meerut** ||82

17) EFFECT OF SELECTED YOGA TRAINING PROGRAMME ON SELF -ESTEEM AND ...
**Dr.Vinu Bhaskar, Alappuzha** ||85

18) A REVIEW OF NEP-2020 AND WOMEN EDUCATION
**WAJIHA KAUSAR, Agra** ||91

19) Geographical Study of Geological Changes of Crime Incidents In Jamner ...
**Rahul Dharmaji Navghare & Dr. Rajendra B. Bhalerao, Dist-Aurangabad** ||94

20) संत साहित्यातील श्री तोताराम महाराज यांचे स्थान
**प्रा.मंगला सखाराम चौधरी, जि. नंदुरबार** ||97

21) संत जनाबाई एक चिंतन
**प्रा.डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी, जि. जालना** ||100

22) बदलत्या हवामानाचा महाराष्ट्रातील शेतीवर होणारा परिणाम : एक अभ्यास
**रजनीकांत तुकाराम करडे** ||103

23) मानवी जीवनात वाचनाचे महत्व आणि ग्रंथालय
**डॉ. रेवाराम एम. मालखेडे, जि. नागपूर** ||105

24) राजर्षी शाहू महाराजांची शेती विषयक विचार : एक अभ्यास
**प्रा.डॉ. रामदास डी. मुक्टे, हिंगोली** ||108

25) राजर्षी शाहू महाराज एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व
**सीमा भाऊसाहेब शेलार, पाथरे बु.** ||111


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

66

COLLEGE HINGOLI

कितीतरी पटीने वाचनाची सवय लाभदायक आहे.

**समारोप :—**

जगभरात असंख्य तत्वज्ञानी, शास्त्रज्ञ, कवी, लेखक, शिक्षक यांची पुस्तके आहेत. प्रत्येक व्यक्तीची जी आवड आहे त्या क्षेत्रातील पुस्तक ग्रंथ वाचन करणे त्याला फायदेशीर ठरू शकते. एखादा खेळाडू लहान असतांना खेळाबरोबर त्या खेळासंबंधीत पुस्तके वाचत राहिला तर त्याची खेळाबद्दल समज किती वाढेल याचा अंदाज आपण लावू शकतो. भारतीय शिक्षण क्षेत्र, सरकारी क्षेत्र, उद्योगी क्षेत्र अशी सर्वत्र क्षेत्र हूशार व्यक्तींसाठी आहेत त्यातील गूढ ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी वाचनाची गोडी आवश्यक आहे.

भारतातील सर्व समाजसुधारक नेते, लेखक वाचनाचे महत्व पटून देतात. तुम्हाला जी भाषा अवगत असेल त्याद्वारे तुम्ही वाचायला सुरवात करा. सुरवातीला कंटाळा वाटेल परंतु सवय झाल्यानंतर तोच कंटाळा दूर होतो आणि फक्त पुस्तक पकडले जाते. आपले संस्कार आणि जडणघडण कशी आहे हे आपल्याला वाचनातून कळते. आयुष्यातील वेगवेगळया दिशांना स्पर्श करण्याचे सामर्थ वाचनातून प्राप्त होते. बुद्धीची आणि तर्कदृष्टीची धार वाढवण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. वाचनामुळे व्यक्तीला पर्यायाने कुटुंबाला, समाजाला एक नवीन विकासाची दृष्टी प्राप्त होते.

**संदर्भ :—**

१) नरगुंदे रेवती, ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, २००२.

२) मिश्र गंगा सागर, पुस्तकालय अनुसंधान, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली, २०११.

३) लेले वसंत वि., ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विविध पैलू, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, २०१२.

४) भागवत शशिकला ग., ग्रंथालय व्यवस्थापन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, २००७.

५) थोरात लक्ष्मण, ग्रंथालय व माहितीशास्त्र, डायमंड पब्लीकेशन, पुणे, २००७.

६) www.bhashanmarathi.com > 2020/11

24

# राजर्षी शाहू महाराजांची शेती विषयक विचार : एक अभ्यास

**प्रा.डॉ. रामदास डी. मुक्टे**
सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

*********

**सारांश**

राजर्षी शाहू महाराजांचे शेती विषयक विचारांचा अभ्यास करतांना स्पष्ट होते. महाराजांच्या काळामध्ये मानव व राष्ट्र विकासामध्ये शेती क्षेत्राची भूमिका अनन्यसाधारण होती. शेती व्यवसायाचे स्वरुप मागासलेले, परंपरागत पध्दतीचे होते. वारंवार पडणाऱ्या दुष्काळाचा प्रभाव या क्षेत्रावर होता. अशा स्थितीत या महत्वपूर्ण क्षेत्राचा व क्षेत्रात काम करणाऱ्या व्यवसायींकाचा विकास व्हावा, त्याच्या जीवनामध्ये सुख, समृध्दी आणि समाधान निर्माण होऊन, शेती व्यवसासाचे आधुनिकीकरण व्हावे. यासाठी महाराजांनी विदेशातील शेती व्यवसायाची पाहणी करत तेथील तंत्रज्ञानाची शेतकऱ्यांना माहिती देते, शेतीला आवश्यक भांडवल, सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर दिला. शेतकरी व त्यांचे पाल्य यांच्या शिक्षणविषयक सुविधांवर महाराजांनी भर दिला. शेती व्यवसायाला पुरक व जोड धंदा करावा, शेतीत नगदी पिके घेतली जावीत अशा प्रकारचे विचार महाराजांचे आहेत. त्यांच्या एकंदरीत विचारातून राज्यातील शेतकरी व शेती व्यवसाय कशाप्रकारे विकसित होईल यांवर महाराजांनी भर दिला आहे.

**संज्ञा** : मनौदार्य, मर्तोदार्य, गौरवास्पद, नितीमूल्य, संस्थान, दारिद्र्य, पारंपारीक.

**प्रस्तावना**

राजर्षी शाहू महाराज एक उत्तुंग व्यक्तीमत्व असुन महाराजांचे मनौदार्य आणि मतोदार्य गौरवास्पद होते. सामाजिक, आर्थिक समता हे त्यांचे प्रमुख ध्येय



Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

होते. महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात मौलाचे कार्य केले आहेत. न्याय, समता, बंधुभाव, मानवता आणि सर्वधर्म समभाव ही राजाला शोभेल अशी प्रकारची नीतिमुल्य महारांच्या विचार, कार्यात दिसून येतात. आपल्या संस्थानाचा राज्यकारभार करतांना राज्यातील प्रत्येक व्यक्ती, समाज कशाप्रकारे सुखी, संपन्न आणि समर्थ राहिल. याची काळजी महाराजांनी घेतली होती. शिक्षणाच्या माध्यमातून समाज सुधारणा घडवून आणता येईल. या विचाराने महाराजांनी सार्वत्रिक मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणप्रसारावर भर दिला आहे. आर्थिक विकासासाठी अज्ञान, अंधश्रध्दा व दारिद्र्य हे तिन प्रमुख घटक समाजातून दूर करणे महत्वाचे आहेत. कारण विकासासाठी हे गतीरोधक असून हे जोपर्यंत समाजातून बाहेर पडणार नाहीत. तोपर्यंत आर्थिक विकासाचे उद्दिष्ट्य गाठता येणे अशक्य असल्याचे मत महाराजांचे होते. त्यांनी यासाठी महत्वपुर्ण कार्य केले आहेत. मानवाच्या वाटयाला आलेले दुःख दारिद्र्य, उपासमारी हे प्रश्न दुर करुन मानवाचा विकास व एकूण राष्ट्राचा आर्थिक विकास घडून आणण्यामध्ये शेती क्षेत्र महत्वाचे आहे. हे महाराजांनी लक्षात घेऊन राज्यातील शेती व्यावसाईक शेतकरी, शेतमजूर व त्यांची मुले यांचा विकास कशा पध्दतीने साध्य करता येईल हयावर महाराजांनी लक्ष केंद्रीत केले. शेती व्यवसाय त्यामधील सुधारणा यावर महाराजांनी आपले विचार प्रकट केले आहे. या विचारांचा आढावा प्रस्तुत संशोधन कार्यात घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :—**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील शेती क्षेत्राच्या स्थितीचा आढावा घेणे.

२) महराजांनी शेती व शेतकरी त्यांच्या विषयी व्यक्त केलेल्या विचारांचा अभ्यास करणे.

३) महाराजांनी शेती व्यवसायामध्ये सुधारणा घडून आणण्यासाठी सांगितलेल्या उपाय योजनांचे विश्लेषण करणे.

**गृहिते :—**

१) राजर्शी शाहू महाराजांच्या काळात उत्पादनाचे प्रमुख क्षेत्र म्हणून शेती ओळखली जात होती.

२) शेती व्यवसायामध्ये पारंपारिक पध्दतीचा उपयोग केला जात होता.

३) शेती व्यवसायावर दुष्काळाचा प्रभाव होता.

४) शेती पुरक उद्योग व्यवसायाचा अभाव होता.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या विविध संशोधन पध्दतीपैकी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :—**

प्रस्तूत लेखन कार्यासाठी आवश्यक असलेले तथ्य संकलन तथ्य संकलनाच्या पध्दतीपैकी द्वितीय तथ्य संकलन साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये विषयासंबधीत संदर्भ ग्रंथ, गौरव ग्रंथ, त्रैमासिक, मासिके, वृत्तपत्रे यामधील लेख अशा साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :—**

राष्ट्रविकासामध्ये शेती हा महत्वाचा घटक आहे. हे लक्षात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी शेती विकासातून मानव विकास व राष्ट्रविकास कशा प्रकारे करता येईल. याविषयी महाराजांनी महत्वाचे विचार मांडले आहेत. महाराजांच्या काळात शेती व्यवसाय हा मागासलेला व्यवसाय असल्यामुळे शेती व्यवसायात काम करणाऱ्या लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले असल्याचे दिसून येते. ही अवस्था दूर करण्यासाठी महाराज सतत प्रयत्नशील असत. महाराज जेंव्हा विदेशी दौऱ्यावर जात असत. तेव्हा त्या भागातील शेती व्यवसायाची विशेष करुन माहिती घेत असत. तेथील तंत्रज्ञानाची माहिती होऊन ती माहिती राज्यातील शेतकऱ्यांना देत असत. शेती व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न महाराजांनी आपल्या संस्थामार्फत केला आहे.

उपलब्ध शेती क्षेत्रातील बहुसंख्य क्षेत्र लागवडीखाली आणण्यावर महाराजांनी भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून कोल्हापूर संस्थानात १८९३—९४ साली प्रत्यक्ष लागवडी असलेली शेत जमीन १२ लाख ९४ हजार १९६ एकर एवढी होती. ती १९२१—२२ साली १४ लाख २६ हजार ५३५ एकर एवढी झाली. म्हणजेच २८ वर्षाच्या कालावधीत १०



SHIVAJI COLLEGE HINGOLI

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

COLLEGE SHIVAJI HINGOLI


टक्के एवढी लागवडी खालील शेत जमीनीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.[१] पडक जमीन लागवडी खाली आणून शेती उत्पादनामध्ये वाढ घडून आणण्याचा हा प्रयत्न महाराजांचा दिसून येतो.

शेतीच्या तुकडीकरणाला विरोध महाराजांनी दर्शविला आहे. शेतीचे लहान—लहान भागात विभाजन झाले. तर त्याचा विपरीत परिणाम उत्पादनावर होतो. त्यासाठी शेतीचे तुकडीकरण होणार नाही यावर महाराजांनी लक्ष केंद्रीत केले होते. त्यांनी १९१३ मध्ये शेतीच्या तुकडीकरणावर नियंत्रण आणण्यासाठी एक कायदा केला. शेतीजमीनीची वाटणी करु नये असे जाहीर केले.[२] शेतीचा आकार मोठा असेल तरच शेतीमध्ये विविध प्रकारच्या सुधारणा करता येतात. असा विचार महाराजांचा होता.

पारंपारिक शेती पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न महाराजांच्या विचारामध्ये दिसून येतो. त्यांच्या मते शेतकऱ्यांनी एकाच पिकावर अवलंबून न राहता बहूपिक पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. शेतकऱ्यांनी शेतीवर नवीन प्रयोग करावेत, भुसार पिकांबरोबरच नगदी पिक लागवडीवर भर दिला पाहिजे. ज्यामध्ये फळझाडांची लागवड करावी. साग, ताग, रेशीम, कापूस अशा नगदी पिकांची लागवड करावी. शेतीला आधारीत जोडधंदे शेतकऱ्यांनी करावीत. उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन व प्रकिया उद्योग.

शेती व्यववसायासाठी जलसिंचनाची आवश्यकता लक्षात घेऊन जलसिंचनाची सुविधा उपलब्ध करुन दुष्काळावर मात करण्यासाठी शेती जलसिंचन सुविधावर महाराजांनी भर दिला आहे. सन १९०७ मध्ये महाराजांनी शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी दाजीपूर जवळ भोगावती नदीवर एक बंधारा बांधला. आणि त्याद्वारे जमीनीला पाणी पुरवठा करण्यात आला. हा बंधारा अन राधानगरी धरण म्हणून प्रसिध्द आहे. दुधना नदीवर दूसरे धरण बांधले हे धरण आज कोल्हापूरी बंधारे म्हणून प्रसिध्द आहेत. अशा प्रकारचे जलसिंचन कार्यही महाराजांनी केले आहेत. ज्यामधून शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे दुःख, दारिद्र्य, दुष्काळ नष्ट होऊन शेतकरी सुखी समृध्द असावा. हा विचार त्यांचा होता. त्यासाठी महाराजांनी तलाव, बंधारे, विहिरी निर्मिती व दुरुस्तीला प्रोत्साहन दिले आहे. की ज्यामुळे सिंचन सुविधा उपलब्ध होतील आणि दुष्काळामध्ये रोजगार निर्मिती होईल.

राज्यातील शेतकऱ्यांनी आधुनिकीकरणाचा अवलंब करावा. त्यासाठी आवश्यक शिक्षण घ्यावे असे विचार महाराजांचे होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी आणि मुलांना शिक्षण द्या असा विचार त्यांचा होता. चोहीकडे अडचणीत पडलेल्या बहुतेक शेतकऱ्यास आपली उघडी—नागडी मुले शाळेत पाठविण्याची सवड होत नाही. तेव्हा सर्व अज्ञानी मुक्या शेतकऱ्यास विद्या देण्याच्या उद्देशाने सरसगटीने लाखो रुपये लोकल फंड गोळा करतात. त्यापैकी एक तृतीयांश रक्कम शेतकरी व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च कराव्यात. शेतकऱ्यांनी आपली मुले शाळेत पाठवावित.[३] अशा प्रकारची शेतकरी व त्यांच्या पाल्याविषयी शिक्षण संदर्भात महाराजांची अपेक्षा होती. शेतकऱ्यांनी शेती प्रयोगशाळेत जावून शेतीविषयी नविन शिक्षण घ्यावे. अशीही अपेक्षा महाराजांना शेतकरी वर्गाकडून होती की, जेणेकरुन यामधून शेती व्यवसायाचे आधूनिकीकरण होईल.

अशा प्रकारे शाहू महाराजांच्या शेती विषयक विचारांचा आणि कार्याचे विश्लेषण करता येते. महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य आजही मार्गदर्शक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष** :—

१) राजर्षी शाहू महाराजांच्या काळात मानव विकास व राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शेती व्यवसाय हा महत्वाचा व्यवसाय होता.

२) शेती व्यवसायाचे स्वरुप पारंपारिक होते.

३) शेतीला सिंचनसुविधाचा अभाव होता.

४) शेतकऱ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत असे. हे चित्र दूर करण्यासाठी महाराजांनी सिंचन क्षेत्राच्या निर्मितीवर भर दिला आहे.

५) शेतीच्या पारंपारीक पध्दतीत बदल घडून आणण्यासाठी शेतकऱ्यांनी भुसार पिकाबरोबरच नगदी पिके घेतले पाहिजेत. असा सल्ला महाराजांनी शेतकऱ्यांना दिला.

६) शेती व्यवसायाबरोबर शेतीपुरक



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

६१A

COLLEGE HINGOLI



व्यवसायावरही शेतकऱ्यांनी भर दिला पाहिजे. हा विचार महाराजांचा होता.

७) शेतकऱ्यांनी स्वत: आणि आपल्या पाल्यांना शिक्षण दिले पाहिजे. आणि तशा प्रकारच्या सुविधा शासनानी करुन द्याव्यात. यावर महाराजांनी भर दिला आहे.

अशा प्रकारचे प्रमुख निष्कर्ष प्रस्तूत संशोधनाची सांगता येतात.

**संदर्भ सूचि :—**

१) बी.डी. इंगळे, आर्थिक विचारांचा इतिहास, २०११, अरुणा प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र. १४३.

२) कित्ता पृष्ठ क्र. १४३.

३) रा. तु. भगत, राजर्षी शाहू छत्रपती, २०१६, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, पृष्ठ क्र. १७६.

**इतर ग्रंथ सूचि :—**

१) पी. बी. साळूंखे, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : १९७६ महाराष्ट्र शिक्षण विभाग, मुंबई.

२) वा. द. तोफखाने, राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार.

३) भा. प. मंगुडकर, महाराष्ट्रातील समाज प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, पूणे विद्यापीठ, १९७५.

□□□

25

# राजर्षी शाहू महाराज एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व

**सीमा भाऊसाहेब शेलार**
संशोधक,
श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, पाथरे बु.

************

**प्रस्तावना :**

शाहू महाराजांनी केवळ लोककल्याणकारी राज्यकारभार केला आहे असे नव्हे तर आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी अनेक विद्या आणि कला यांना आश्रय दिला. इतिहासात जे महान राज्यकर्ते होऊन गेले, त्यांच्या चरित्राकडे पहिले की, शाहू महाराज हे शूर व पराक्रमी असून देखील त्यांच्या आश्रयाखाली अनेक विद्या व कला यांनी त्यांच्या पराक्रमाइतकीच आपल्या प्रगतीची उंची गाठली होती.

**मल्लविद्येचे पुनरुज्जीवन**

प्राचीन काळापासून भारतामध्ये बहुतेक राजे महाराज हे मल्लाविद्येमध्ये पारंगत होते. शाहू महाराज स्वत: मल्लविद्येवर प्रेम करत होते त्याचबरोबर ते एक पट्टीचे मल्ल होते. त्यांच्या लहानपणापासून त्यांच्यावर मल्लविद्येचे संस्कार झालेले होते. इ.स. १८८४ मध्ये गादीवर आल्यावर कोल्हापुरातील मल्लविद्येच्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचा त्यांनी निर्धार केला. इ.स. १८९५ मध्ये जुन्या राजवाड्याच्या परिसरात मोतीबाग या तालमीची स्थापना केली. तेथे त्यांचे मल्लविद्येचे शिक्षण दत्तोबा शिंदे, पांडोबा भोसले व बालेखान पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

इ.स. १८९७ मध्ये त्यांना पुत्ररत्न झाल्यावर, ते निमित्त साधून कुस्तीचा एक जंगी आखाडा कोल्हापुरात आयोजित केला. त्यामध्ये त्यांनी पंजाबी मल्ल यांना पाचारण करून त्यांचे मल्लविद्येतील कौशल्य दाखवून कोल्हापुरातील मराठी मल्लांना चारीमुंड्या चितपट केले.

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist. Hingoli (M.S.)



68 B